पुढारी

# हिवाळी सत्रातील परीक्षा शांततेत सुरू

## ३२ अभ्यासक्रम; ११ हजार १५६ विद्यार्थी उपस्थित

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने हिवाळी सत्रातील पदवी, पदव्यत्तर परीक्षांना सोमवारी शांतेतत सुरुवात झाली. ३२ विविध अभ्यासक्रमासाठी ११ हजार १५६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. सांगली, कोल्हापूर व सातारा जिल्ह्यातून ८ गैरप्रकार आढळून आले असून त्यांच्यावर कारवाई होणार आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा २ जानेवारी पासून सुरू झाल्या आहेत. विद्यापीठ व महाविद्यालयीन कर्मचारी संपामुळे चार दिवसांच्या परीक्षा स्थगित करण्यात आल्या होत्या. त्यानंतर विद्यापीठाने पर्यायी व्यवस्था करीत सोमवारपासून नियोजित वेळापत्रकाप्रमाणे परीक्षा सुरू केल्या आहेत.

एम. कॉम., एम. एस्सी., बी. एस्सी., एमबीए, बी. टेक., बीए., एम. (भूगोल), बी. आर्किटेक्चर,



एमएसडब्ल्यू., बीसीए, डिप्लोमा इन टॅक्सेशन, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन कॉम्प्युटर सायन्स, एमएस्सी (टेक्नॉलॉजी) अशा ३२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालये व अधिविभागात झाल्या.

महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समिती परीक्षांच्या कामकाजावर बहिष्कार असताना अधिविभागप्रमुख, शिक्षक, महाविद्यालयातील प्राचार्य, संपात सहभाग नसलेले शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्या सहकायनि परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

तरूण भारत

# प्राचार्य, प्राध्यापकांच्या मदतीने विद्यापीठ परीक्षांना प्रारंभ



- कंत्राटी कर्मचारी व पदव्युत्तरच्या विद्यार्थ्यांची घेतली मदत
- विद्यापीठ कर्मचारी संपावर ठाम

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

विद्यापीठ अंतर्गत्त पदवी व पदव्युत्तर परीक्षेच्या कामकाजावर विद्यापीठ व महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांनी बहिष्कार टाकला आहे. त्यामुळे तीन दिवसांच्या परीक्षा स्थगित केल्या होत्या. या परीक्षा शासनाच्या परवानगीशिवाय कशा स्थगित केल्या, असा प्रश्न सरकारने विचारला. त्यामुळे कर्मचारी संपावर ठाम असताना विद्यापीठ प्रशासनाने प्राध्यापक, प्राचार्य आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मदतीने सोमवारपासून परीक्षा पुर्ववत सुरु झाल्या. या सर्व परीक्षा सुरळीत पार पडल्या, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

विद्यापीठ अंतर्गत एम. कॉम., एम. ए., एम. एस्सी., बी. एस्सी., एम. बी. ए., बी. टेक., बी. ए., एम. ए. जॉगराफी, बी. आर्किटेक्ट, एम. एस. डब्ल्यू, बी. सी. ए., डिप्लोमा ईन टॅक्शन, पोस्ट ग्रॅच्युएट डिप्लोमा इन कॉम्प्युटर ॲप्लीकेशन, नॉन सायन्स टेक्नॉलॉजी, बॅचलर ऑफ लॅब्ररी इन इन्फर्मेशन सायन्स, मास्टर ऑफ लॅब्ररी इन इन्फर्मेशन सायन्स, मास्टर ऑफ रूरल स्टडीज, एम. एस्सी. टेक्नॉलॉजी, बॅचलर ऑफ आर्ट ॲन्ड बॅचलर ऑफ एज्युकेशन, एम. कॉम. इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी यासह ३२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने पार पडल्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

07 FEB 2023 पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा दि. २ जानेवारीपासून व्यवस्थितपणे सुरू झाल्या. विविध मागण्यांसाठी सेवक संघातर्फे कामकाजावर बहिष्कार टाकला होता. या काळात स्थगित करण्यात आलेल्या परीक्षा पूर्ववत सुरू झाल्या. दि. ६ फेब्रुवारी रोजी ३२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालये व अधिविभागामध्ये सुरळीतपणे पार पडल्या असून, सदर परीक्षांसाठी एकूण ११,१५६ विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समिती यांनी दि. २ फेब्रुवारीपासून आंदोलनाचा निर्णय घेतल्यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या सर्व परीक्षांच्या कामकाजावर बहिष्कार असताना अधिविभागातील अधिविभागप्रमुख, शिक्षक, महाविद्यालयातील प्राचार्य, संपात सहभाग नसलेले शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी यांच्या सहकार्याने परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या.

परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. या पथकांकडून दि. ६ फेब्रुवारी रोजी सांगली, कोल्हापूर व सातारा या तीन जिल्ह्यांतून एकूण ८ गैरप्रकारांची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आली आहे. तसेच परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.

0 7 FEB 2023
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


## शिक्षक, विनाअनुदानित विभागातील कर्मचारी मदतीला; शिक्षकेतर कर्मचारी आंदोलनावर ठाम

# विद्यापीठाच्या परीक्षा पूर्ववत सुरू

▸ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ६ : शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आंदोलनामुळे शिवाजी विद्यापीठाने स्थगित केलेल्या पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षाच्या परीक्षा आजपासून पूर्ववत सुरू झाल्या. दिवसभरातील दोन सत्रांमध्ये एकूण ११ हजार १५६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. विद्यापीठातील अधिविभाग आणि कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील संलग्नित महाविद्यालयांनी शिक्षक, विनाअनुदानित विभागातील कर्मचाऱ्यांची मदत परीक्षा कामकाजासाठी घेतली.

बी. कॉम., बी. ए., बी. एस्सी., बी. टेक., आर्किटेक्चर, बी. ए. बी. एड., बी. कॉम., बँक मॅनेजमेंट अशा विविध ३२ विषयांच्या परीक्षा सोमवारी सकाळी साडेदहा ते दुपारी दीड आणि दुपारी अडीच ते सायंकाळी साडेपाच अशा दोन सत्रांमध्ये घेण्यात आल्या.



कोल्हापूर : शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या आंदोलनामुळे शिवाजी विद्यापीठाने स्थगित केलेल्या हिवाळी सत्रातील परीक्षा सोमवारपासून पूर्ववत सुरू झाल्या. शहाजी महाविद्यालयातील केंद्रांवर परीक्षा घेण्यात आली.
(बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

वर्णनात्मक ऑफलाईन असे या परीक्षांचे स्वरूप होते. विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या सूचनेनुसार कार्यवाही करत अधिविभाग आणि महाविद्यालयांनी परीक्षांची सुरुवात केली. प्राचार्य, अधिविभागप्रमुखांनी प्राध्यापक, शिक्षक, विनाअनुदानित विभागातील कर्मचाऱ्यांच्या मदतीने परीक्षा घेतल्या. परीक्षा केंद्र असलेले विभाग, महाविद्यालयांचा परिसर विद्यार्थ्यांच्या गर्दीने फुलला होता. परीक्षा पूर्ववत सुरू झाल्याने त्यांना दिलासा मिळाला. दरम्यान, राज्य विद्यापीठीय आणि महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे परीक्षा कामकाजावरील बहिष्कार आंदोलन कायम आहे.

'एमबीए द्वितीय वर्षातील एचआर विषयाचा पेपर मी आज दिला. पेपरचे स्वरूप बदलल्याने तो सोडविताना आमचा कस लागला. परीक्षा पूर्ववत सुरू झाल्याने मानसिक तणाव संपला.
**-प्राजक्ता पाटील**, विद्यार्थी, किणी

### कॉपी करताना ८ विद्यार्थी सापडले

■ परीक्षेच्या कालावधीत कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील केंद्रांवर गैरप्रकार (कॉपी) करणारे ८ विद्यार्थी हे विद्यापीठाच्या भरारी पथकांना सापडले. त्यांच्यावर परीक्षा प्रमाद समितीच्या नियमानुसार कारवाई केली जाईल, असे परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले. राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समितीचे आंदोलन सुरू असताना अधिविभागप्रमुख, शिक्षक, महाविद्यालयातील प्राचार्य, आंदोलनात सहभागी नसलेले शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्या सहकार्याने परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या असल्याचे त्यांनी सांगितले.

लोकमत

# ११ हजारांवर विद्यार्थ्यांनी दिल्या विद्यापीठाच्या परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने पूर्वतयारी केल्यानुसार सोमवारी दिवसभरात दोन टप्प्यात घेण्यात आलेल्या हिवाळी सत्रातील पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या ३२ परीक्षा सुरळीत पार पडल्या. दिवसभरात विविध केंद्रांवरील ११,१५६ विद्यार्थ्यांनी या परीक्षा दिल्या. या परीक्षेदरम्यान कोणताही गोंधळ झाला नसल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, शिवाजी विदयापीठ सेवक संघाच्या कर्मचाऱ्यांचा परीक्षा कामकाजावर बहिष्कार कायम होता.

Times of India

# Semester exams at SUK restart; 8 students caught copying by flying squads

**Kolhapur:** The winter semester's graduate and post-graduate exams at Shivaji University, Kolhapur, restarted on Monday. They were after being cancelled due to the ongoing boycott by the Maharashtra State University and College Employees' joint action committee.

A total of 11,156 students attended the exams for 32 courses in various colleges and departments in offline mode on Monday, Dr Ajitsinh Jadhav, director of the exam and evaluations department of SUK, said. "A total of 8 students were found misbehaving and involved in malpractice from the three districts of Sangli, Kolhapur and Satara by the flying squad formed by SUK administration," Jadhav added. TNN

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 FEB 2023
लोकमत

# शिवाजी विद्यापीठाची घोडदौड कायम

## पश्चिम विभागीय क्रिकेट स्पर्धा : मुंबई, गुजरात विद्यापीठ संघाचा केला पराभव

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : पंडित दीनदयाल शेखावती विद्यापीठ, सिकर (राजस्थान) येथे सुरू असलेल्या आंतरविद्यापीठीय पश्चिम विभागीय क्रिकेट स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने सरदार वल्लभभाई पटेल विद्यापीठ (गुजरात), एच.एस.एन.सी विद्यापीठ (मुंबई), केव्हीएस विद्यापीठ गांधीनगर (गुजरात) मात करीत विजयी घोडदौड कायम ठेवली.

पहिल्या सामन्यात शिवाजी विद्यापीठाने सरदार वल्लभभाई पटेल विद्यापीठ गुजरातचा पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना शिवाजी विद्यापीठ संघाने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत १८२ धावा केल्या. यात अनिमेष पाटील ने ६५, सूरज कोंढाळकरने ४५ धावा केल्या. जयेश पोळने २२ धावा केल्या. उत्तरादाखल खेळताना पटेल विद्यापीठाचा डाव ११३ धावांत गुंडाळला. शिवाजी विद्यापीठाकडून अथर्व शिंदे पाच गडी बाद करत निम्मा संघ गारद केला.

दुसऱ्या सामन्यात शिवाजी विद्यापीठाने एच.एस. एन. सी. विद्यापीठ (मुंबई)चा पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना एच.एस.एन.सी विद्यापीठाने २० षटकांत ९बाद १२२ धावा केल्या. उत्तरादाखल खेळताना शिवाजी विद्यापीठाने हा सामना सहज जिंकला. यात सुरज कोंढाळकर याने ३५, तर, अनिमेष पाटील ३२, जयेश पोळ याने २५ धावा केल्या. तिसऱ्या सामन्यात शिवाजी विद्यापीठाने केव्हीएस विद्यापीठ (गांधीनगर) संघाचा पराभव केला.

0 7 FEB 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वेस्ट झोन क्रिकेटमध्ये शिवाजी विद्यापीठाचा दबदबा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राजस्थानमधील सिकर येथील पंडित दीनदयाल शेखावती विद्यापीठात सुरू असलेल्या आंतरविद्यापीठ वेस्ट झोन क्रिकेट स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठ संघाने उत्कृष्ट कामगिरी करत विजयी घोडदौड कायम ठेवली.



पहिल्या सामन्यात शिवाजी विद्यापीठाने गुजरातच्या सरदार वल्लभभाई पटेल विद्यापीठाला धूळ चारली. प्रथम फलंदाजी करताना शिवाजी विद्यापीठ संघाने निर्धारित २० षटकांत १८२ धावांचे उद्दिष्ट गुजरात संघासमोर ठेवले होते. त्यामध्ये अनिमेष पाटील याचा ६५ धावांचा सहभाग आहे. सूरज कोंढाळकर याने ४५ धावा, तर जयेश पोळ याने २२ धावा केल्या. हे आव्हान सरदार वल्लभभाई पटेल संघाला पेलवले नाही. अवघ्या ११३ धावांतच त्यांचा डाव गुंडाळला. शिवाजी विद्यापीठाकडून अथर्व शिंदे याने पाच गडी बाद केले.

दुसरा सामना मुंबईच्या एचएसएनसी विद्यापीठ संघाबरोबर झाला. प्रथम फलंदाजी करताना एचएसएनसी विद्यापीठाने २० षटकात ९ बाद १२२ धावा केल्या. शिवाजी विद्यापीठकडून अथर्व शिंदे, प्रथमेश पाटील व आर्य शहा यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. शिवाजी विद्यापीठाने विजयासाठी १२३ धावांचे टार्गेट सहज पूर्ण केले. शिवाजी विद्यापीठाकडून सूरज कोंढाळकर याने ३५ धावा, अनिमेष पाटील याने ३२, तर जयेश पोळ याने २५ धावा केल्या.

तिसऱ्या सामन्यात शिवाजी विद्यापीठाने गुजरातमधील गांधीनगरच्या केव्हीएस विद्यापीठ संघावर दणदणीत विजय मिळवला. प्रथम फलंदाजी शिवाजी विद्यापीठाने २० षटकांत ९ बाद १६६ धावा केल्या. सूरज कोंढाळकर ४८ धावा, अनिमेष पाटील ४० धावा, तर कर्णधार प्रथमेश पाटील याने ३० धावा केल्या. केव्हीएस विद्यापीठ संघाचा डाव १२८ धावांत संपुष्टात आला. शिवाजी विद्यापीठाकडून अथर्व शिंदे याने तीन, तर आर्य शहा याने दोन बळी घेतले. शिवाजी विद्यापीठ संघाला कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, शिवाजी विद्यापीठाचे क्रीडा विभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे, संघाचे प्रशिक्षक प्रा. संदीप पाटील व संघ व्यवस्थापक प्रा. देवदत्त महात्मे यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
07 FEB 2023 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ 'सिनेट'ची उद्या पहिली बैठक

कोल्हापूर, ता. ६ : शिवाजी विद्यापीठाच्या नव्या अधिसभेची (सिनेट) पहिली बैठक बुधवारी (ता.८) दुपारी १२ वाजता विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात होणार आहे. त्यामध्ये अधिसभा सदस्यांमधून व्यवस्थापन परिषदेवर सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी निवडणूक होईल. त्यासह इतर अधिकार मंडळांवर सदस्यांचे नामनिर्देशन केले जाणार आहे.

विद्यापीठाची अधिसभा निवडणूक नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात झाली. त्यानंतर अधिसभा आणि अन्य अधिकार मंडळांवरील सदस्यांच्या नामनिर्देशनाची प्रक्रिया सुरू झाली. त्यामध्ये व्यवस्थापन परिषदेतील ८ जागांपैकी एक जागा रिक्त आहे. उर्वरित ७ पैकी ५ जागांवर सदस्यांची बिनविरोध निवड झाली आहे. आता शिक्षक प्रवर्गातील खुल्या गटातील एक आणि नोंदणीकृत पदवीधर गटामधील एक जागेसाठी निवडणूक होणार आहे. त्यातील शिक्षक गटासाठी तीन, तर नोंदणीकृत पदवीधरमधन दोन उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. त्यांच्यासाठी बुधवारी अधिसभेच्या बैठकीत मतदान होणार आहे. या वेळी विद्यापीठाची स्थायी समिती, तक्रार निवारण समिती, शिष्यवृत्ती समितीची नियुक्ती केली जाणार आहे.